।। ॐ श्री साईराम ।।

प्रश्नोत्तरे ७७

प्रश्नोत्तरांच्या सत्रात आपले स्वागत असो. आठवड्यांमागून आठवडे आपल्याकडे विचारांना चालना देणारे प्रश्न येत आहेत. या प्रश्नांमुळे खरंच आम्हाला खूप उत्तेजना मिळते. आजचा प्रश्न खासच वेगळा आहे. प्रश्न असा आहे की 'परस्पर विरोध का? का? काही विधाने विरोधाभासयुक्त का असतात? सगळे विरोधाभासी का वाटते? का?'

काही वेळा भगवत् गीतेमध्ये म्हटले आहे की 'तुम्ही साकार ईश्वराला, रुपातील ईश्वराला भजा. पुढे दुसऱ्या परिस्थितीमध्ये म्हटले आहे की सत्य निराकार आहे. एका टप्प्यावर म्हटले आहे की ईश्वर सगुण आहे. त्याच्याकडे सगळे गुण आहेत. दुसऱ्या अध्यायात म्हटले आहे तो निर्गुण आहे. एका ठिकाणी म्हटले आहे की ईश्वर जन्मत: काळ (वेळ) आहे. आणि संभवामी युगे युगे तो परत परत अवतार धारण करतो. जर तुम्ही भगवत् गीतेमध्ये खोलात शिरलात तर म्हटले आहे की 'ईश्वराला आदी आणि अंत नाही' ही सगळी विधाने काय आहेत? ही विधाने परस्पर विरोधी वाटतात. फारच गोंधळ निर्माण करतात. ती तिथे थांबतही नाहीत.

आपण भगवान बाबांकडे वळू या. ते म्हणतात, त्यागापेक्षा श्रेष्ठ काही नाही. 'न कर्मणा न प्रजया धनेन त्यागेनैके अमृतत्व मग्नशु:' त्या अमृतत्वासाठी, दिव्यत्वासाठी त्यागाशिवाय दुसरे काहीही उपयुक्त नाही. ठीक? आपल्याकडे जे काही आहे त्या सगळ्याचा आपण त्याग करावा असे त्यांना वाटते. आपली बुद्धी, आपला वेळ, आपली साधन सामग्री, संपत्ती जे काही असेल ते!

''त्यागे नैक अमृतत्व मानशु:''

इथे त्याग म्हणजे फक्त आपल्या संपत्तीचा त्याग असा अर्थ नाही. आपल्या देहबुद्धीचा त्याग, देहाचा मनाशशी असलेल्या संबंधांचा त्याग. जे आत्मा नाही त्या सगळ्या गोष्टींचा त्याग, स्वत: नाही म्हणजेच स्वरहित गोष्टींचा त्याग. ते तुम्हाला अमृतत्व किंवा अमरत्व किंवा दिव्यत्व प्राप्त करून देईल.

पण काही लोकांना हे समजते. जेव्हा स्वामी काही लोकांबद्दल बोलतात. उदा. कुलवंत रॉय. जेव्हा स्वामी त्याच्याबद्दल बोलतात तेव्हा ते म्हणत, ''ओह! तो त्यागीच माणूस आहे. त्याने त्याची बहुतेक सारी संपत्ती सेवा कार्यासाठी वापरली.'' स्वामी कुलवंत रॉयचे कौतुक करताना असे म्हणत असत. आपल्याला माहीत आहे की स्वामी कामानीचे सुद्धा त्याग आणि भक्तीसाठी कौतुक करीत असत. त्याच स्वामींनी म्हटले होते की ''पैसा हा मार्ग नाही. पैशाचा काही उपयोग नाही. पैसा मुक्तीची खात्री देत नाही.'' म्हणून मग मी देवू का नको? मी माझ्या पैशाचा त्याग करू का नको? सढळ हाताने देवू का नको? कारण स्वामी म्हणतात की अध्यात्मामध्ये पैशाला काही स्थान नाही.

मग आपल्यासाठी दानाचा अर्थ काय? त्यागाचा अर्थ काय? काय बरे करावे? स्वामींनी ज्यांची नावे जाहीरपणे घेतली त्यांनी त्यांच्या संपत्तीचा त्याग केला ना? हो, त्यांनी केला. म्हणूनच स्वामींनी त्यांचे कौतुक केले. पण नंतर ते म्हणाले, ''अध्यात्माचे पैशाशी काहीही नाते नाही.'' विरोधाभास! मी काय म्हणू?

अशा प्रकारे भगवान बाबांच्या विधानांमध्ये विरोधाभास आपल्याला पाहायला मिळतो. भगवत् गीतेमध्ये आपल्याला विरोधाभास दिसतो. हे फारच गोंधळात टाकणारे आहे. गोंधळ संशयातीत आहे. आता मी काय करावे बरे? आता आपण स्वामींची प्रवचने पाहू आणि त्यातून मौल्यवान रत्ने गोळा करू. त्यांच्या दिव्य संदेशांमधून आपण रत्ने वेचू.

ते अतिशय सुंदर उदाहरण इथे देतात. एक सद्‌गृहस्थ त्यांना भेटायला येतात. स्वामी त्यांना विचारतात, ''ओ सर, तुम्ही कधी आलात?'' ते उत्तर देतात, ''मी आत्ताच आलो.'' याचा अर्थ काय? ''मी आत्ताच आलो म्हणजे ते त्यांच्या देहाच्या संबंधाने बोलत आहेत. ''माझा देह इथे आहे आणि म्हणून मी देह आहे. मी आत्ता आलो आहे.'' म्हणजे जेव्हा तुम्ही मी आत्ता आलो आहे असे म्हणता तेव्हा तुम्ही तुमच्या देहाच्या संबंधांनी बोलता.

काही दिवसांनी त्याला भेटल्यावर तो म्हणतो, ''सर! मी मोठ्या आजाराने ग्रस्त झालो आहे.'' हे काय आहे? ''माझे पोट दुखत आहे. माझे डोके दुखत आहे. माझे मन अस्वस्थ झाले आहे.'' म्हणजे जेव्हा तो म्हणतो मी इथे आलो आहे तेव्हा तो त्याच्या देहाबरोबर त्याची ओळख सांगतो. जेव्हा तो म्हणतो माझे डोके दुखते आहे. मन अस्वस्थ आहे म्हणजे त्याचे डोके, मन त्याच्यापासून वेगळे आहे. इंद्रिये माझ्यापासून वेगळी आहेत. म्हणजेच एकदा देहाबरोबर संबंध आणि एकदा देहाबरोबर संबंध नाही. हे परस्परविरोधी नाही का? नक्कीच आहे! आता आपण त्याच्याकडे कसे बघायचे?

हे सगळे परिस्थितीवर अवलंबून आहे. तसेच आपली समज शक्ती आणि आपल्या जन्म संस्कारांवर अवलंबून आहे. जे काही पूर्वजन्मांमध्ये चांगले कर्म घडले त्या संचितावर अवलंबून आहे. त्यावरच आपल्याला ही दिव्य विधाने समजू शकतील.

तेव्हाच ती परस्परविरोधी नाहीत हे समजू शकेल. ती आजिबात विरोधाभासात्मक नाहीत! एक विधान दुसऱ्याकडे घेवून जाते. ती सगळी विधाने माझ्या रुचीला, स्वभावाला, प्रवृत्तीला आणि समजशक्तीच्या पातळीस अनुरूप आहेत.

भगवत् गीता परस्परविरोधी विधानांनी भरलेली आहे या निष्कर्षाप्रत येण्यापूर्वी आपल्याला हे स्पष्टपणे माहीत असले पाहिजे. आपण असे म्हणता कामा नये. भगवत् गीतेमध्ये विरोधाभासी विधाने आहेत असे सार आपण काढता कामा नये. तसेच स्वामींच्या म्हणण्याचा अर्थ आपण आपल्या पद्धतीने लावता कामा नये. आपण असं करू शकत नाही.

आपल्या मनात असलेल्या पक्क्या भावना, विचार, समज किंवा धारणा घेवून आपण तिथे जाता कामा नये. आपल्या मनाची दारे सताड उघडी पाहिजेत म्हणजे मोकळ्या मनाने आपण लक्षात घेतले पाहिजे की ईश्वर ही काही एक संज्ञा नाही. ईश्वर काही एक विचार नाही आणि माझी त्याच्यात विलीन होण्याची तयारी हवी. म्हणजे ईश्वर त्या क्षणी जे सांगतो आहे त्याचा स्वीकार करण्याची तयारी हवी. मी त्याला पूर्ण समर्पित आहे. हे असले पाहिजे. तुम्ही तिथे नाही तर तुम्ही त्याच्यात विलीन झाला आहात! तेव्हाच तुम्हाला गोष्टी अगदी स्पष्ट, स्वच्छ होतील. त्यानंतर कुठलाही विरोधाभास असणार नाही.

ही सगळी विधाने म्हणजे साधने आहेत हे तुमच्या लक्षात येईल. आपल्या मनातील पक्क्या धारणा, मते, समज, कल्पना इत्यादींचा नाश करण्याचे कार्य ती विधाने करतात. मनात कुठेतरी खोलवर मी काय करू? असा प्रश्न ठाण मांडून बसलेला असेल! तोपर्यंत माझा गोंधळ होणारच! दुसरा त्याला काही मार्ग नाही. जेव्हा आपण एखादा मार्ग निवडतो आणि आयुष्यभर त्या मार्गावर मार्गक्रमण करतो तिथे प्रगती थांबते.

उदा. मला कर्म आवडते. कर्मयोग आवडतो. मी आयुष्यभर सेवा करत राहतो कारण मी कर्म करणे मागून घेतले आहे. मला माझ्या ऑफिस बेअररर्सद्वारा कर्मयोग सांगितला गेला.

स्वामींच्या द्वारा कर्मयोगाचा आदेश दिला गेला वा माझ्या साई संदेशाच्या वाचनातून मी त्या निष्कर्षाप्रत आलो. त्यावर अटळ राहून काय होते? मी माझे स्वातंत्र्य गमावून बसतो. कारण तुम्ही काही निष्कर्षांपर्यंत पोचलेले असता. तुम्ही ठरवलेले असते आणि तुम्ही त्या विचाराला चिकटून बसलेले असता. तुमच्या स्वातंत्र्याचे काय? जेव्हा तुम्ही एखाद्या विचाराला घट्ट चिकटून राहता किंवा एखादा मार्ग आक्रमता तेव्हा तुम्ही तुमचे स्वातंत्र्य गमावता.

जीवन ही नदी आहे. ते वाहत असते. आपण पुढे जात असताना आपल्यात वृद्धी झाली पाहिजे. विकास झाला पाहिजे. हे आपण जाणले पाहिजे. मुळात आपण स्पष्ट जाणले पाहिजे की 'सत्य' सांगता येत नाही. नाही! सभोवतालच्या जगतामध्ये सत्याला मर्यादित करता येत नाही. नंतर आपण एका मार्गाला चिकटून राहू शकत नाही. नाही! जेव्हा आपण मनाच्या आधीन नाही तेव्हा ते शक्य आहे. जर तुम्ही मनाच्या आधीन असाल, जोडलेले असाल मनाच्या संबंधाने ओळखत असाल तर काय होईल? आपण सत्याला जाणू शकणार नाही. आपण उन्नत होणार नाही. आपला विकास होणार नाही. तुमचे स्वातंत्र्य उपभोगण्यासाठी तुम्हाला अवकाश मिळाला पाहिजे. मनाच्या आधीन नसतानाच तुम्ही उन्नती करू शकता.

त्यानंतर मन कलुषित होता कामा नये, पूर्वग्रहदूषित असता कामा नये. तुम्ही आचरत असलेल्या एका विशिष्ट मार्गावर अडकता कामा नये. आपण संपूर्ण सावधानतेने सत्याला जाणले पाहिजे. या सगळ्या सूचना असून, ईश्वरीय रचना आहेत. आपल्या स्वत:च्या साधनेवर अवलंबून आपण त्यावर मार्गक्रमणा करू शकतो. आत्मसात करू शकतो.

आपण स्वामींचे संदेश अत्यंत शांतपणे आणि हुशारीने सारासार विचारबुद्धीने, शहाणपणाने ऐकले पाहिजेत हे अगदी स्पष्ट आहे. शांतपणे म्हणजे मनाला शांत करून जे सांगितले आहे त्याचा स्वीकार करा. विवेकबुद्धीने म्हणजे सावध चित्ताने. स्वामी त्या क्षणी जे सांगत आहेत ते सत्य असून सत्याशिवाय दुसरे काहीही नाही. म्हणून आपण त्यांना अत्यंत शांतपणे आणि आपली विवेकबुद्धी जागृत करून ऐकले पाहिजे. तेव्हाच स्पष्टता येईल. त्यानंतर ती विधाने विरोधाभासी वाटणार नाहीत. समोर दिसणारी परस्परविरोधी विधाने. फक्त चिन्हे आहेत. फक्त सूचित करतात. हळूहळू आपल्यामध्येच खरी विवेकबुद्धी आहे हे स्पष्ट होत जाते. ही आत्म्याची जाणीव म्हणजे मुक्ती. हो. आत्म्याशिवाय दुसरे काहीही मोक्ष नव्हे. आत्मा म्हणजे मोक्ष, अनादी, अमर आत्मा.

म्हणून हे अगदी स्पष्ट आहे की जेव्हा आपण काही करतो तेव्हा सेवा करावी. 'मी' करतो आहे. हो. 'मला' प्राप्त करायचे आहे. 'मला' मिळवायचे आहे. या सगळ्यातील 'मी' म्हणजे अहंकार आपल्यातील कुरुपता वाढवतो. होय! जसा नाग आपला फणा काढतो तसेच म्हणून कर्त्यामध्ये अहंकार येतो. हा अहंकार वर येतो. मी कर्ता असा अहंकार होतो. म्हणून काही वेळा काही लोक विशिष्टपणे म्हणतात, ''मी ध्यानात आहे. मी रोज ध्यान करतो. मी ध्यान करतो.'' हे चुकीचे आहे.

ध्यान ही क्रिया नाही. नाही! ध्यान ही प्रक्रिया नाही. नाही! ध्यान करता येत नाही. उदा. प्रेम, प्रेम ही कृती नव्हे. नाही! तुम्ही फक्त प्रेम करता. बस्स! तुम्ही प्रेमाची कृती करत नाही. जेव्हा तुम्ही प्रेमाची कृती करता तेव्हा ते ढोंग होते. ते खरे नसते.

जसे प्रेम तसे ध्यान. ते होते बस्स! तुम्ही काहीही करत नाही ते होते. हे अगदी स्पष्टपणे लक्षात ठेवले पाहिजे.

जेव्हा तुम्ही दिव्य संदेशांच्या चिंतनात असता तेव्हा तुमचे अज्ञान दूर व्हायला सुरुवात होते. जाणीव जागृत व्हायला सुरुवात होते. जेव्हा आपण जास्तीत जास्त साई साहित्याचे वाचन करतो. आपले अज्ञान दूर होते. तुमची जाणीव सहजपणे हळूहळू स्पष्ट होत जाते. म्हणून आपण आपल्या स्वामींचे खूप खूप आभारी आहोत.

पण अहंकार परत परत मधे मधे येतच असतो. कारण त्याला कर्म करायचे असते. अहंकार तुम्हाला परत परत आज्ञा करत असतो, 'ये हे तू कर, तू कर.' 'काहीतरी कर. काहीतरी प्राप्त कर. काहीतरी ध्येय गाठ.' हा अहंकाराचा स्वभाव आहे. तो तुम्हाला बसू देत नाही. तो तुम्हाला शांत राहू देत नाही. नाही. पण हळूहळू आपल्या लक्षात यायला लागते की मला काही हवे आहे, मला काही मिळवायचे आहे. साध्य करायचे आहे हीच भावना सगळ्यात मोठा अडथळा आहे. हो! मोठ्ठा अडथळा! कारण काही साध्य करायचे नाही. कुठेही पोचायचे नाही. तुम्हाला काहीच करायचे नाही. तुम्ही स्वत:च त्याच स्थितीत आहात. तुम्ही आत्मा होणार नाही. तुम्ही आत्मा साध्य करणार नाही. तुम्ही आत्म्याला मिळवणार नाही. तुम्ही स्वत: तेच आहात. तत् त्वं असी, तत् त्वं असी. तुम्हीच ते आहात. म्हणून अशा प्रकारचा खेळ मनाचा, अहंकाराचा आपल्या आयुष्यात रोजच चालू असतो. हेच सगळ्या विरोधाभासांचे मूळ कारण आपल्या जीवनशैलीत आहे.

मुख्य काय तर जेव्हा अहंकार नसतो तेव्हा खरी जाणीव होते, हेच मूलत: सत्य आहे. जेव्हा तुम्ही नाही तेव्हा तुम्ही ज्ञानी आहात. बस्स! एवढेच काय ते! आणि त्या आत्मज्ञानाच्या अवस्थेमध्ये तुम्हाला संपूर्ण विश्वाच्या निर्मितीबद्दल समजेल. सृष्टीवर प्रकाश पडेल. आत्मज्ञानाचे प्रकटीकरण, दिव्य योजना, दिव्य नियोजन, दिव्यत्व समजेल, जाणवेल. सूर्यकिरणांमधील दिव्यत्व आपल्या लक्षात येत नाही का? ही ज्ञानाची सूचना नाही का? ही आत्मज्ञानाची सूचना नाही का? आपण पहाटे कोकीळ, नाइटिंगेल पक्ष्यांचे मंजूळ आवाज ऐकताना आनंदित होतो ना? हे दिव्यत्वाचे प्रतिबिंब नाही का? वारा सुटल्यावर झाडाच्या पानांची सळसळ होते तो हलकासा आवाज ऐकून किती प्रसन्न वाटते! हे काही कर्म आहे का? यात काही मिळवले आहे का? वेडेपणा! नाही! हे सगळे दिव्यत्वाचे ज्ञान, प्रकटीकरण आहे. आपल्याला त्यातून दिव्यत्वाची जाणीव होते. यासाठी काहीही करायला लागत नाही. नाही. काही कृती केली की ती बहिर्मुख असते. काहीही न करणे म्हणजे अंतर्मुखता. तेव्हा तुम्ही अंतर्मुख असता तेव्हा तुम्ही जिथे असायला पाहिजे तिथे असता.

दुसऱ्या बाजूने विचार केला तर कर्मे करून तुम्ही भविष्य घडवता. पुढील काळात काहीतरी व्हावे असे तुम्हाला वाटत असते. तो काल आहे. ईश्वर कालातीत आहे. काहीही न करता तुम्ही दिव्यत्वात सहजतेने राहू शकता. तुमचा विकास, वृद्धी होत राहते आणि तुम्ही अखंड जीवनप्रवाहात प्रगती करत राहता. त्यानंतर कुठलाही विरोधाभास किंवा परस्परविरोधी मते, विधाने शिल्लक राहत नाहीत.

धन्यवाद

ॐ श्री साईराम